# **Press note**

गडचिरोली दि. ३०/०६/२०१७

## *हरवलेल्या बालकांचा शोध घेण्यासाठी गडचिरोली जिल्हा पोलीस राबविणार ऑपरेशन मुस्कान*

महाराष्ट्र राज्यात ० ते १८ वर्ष वयापर्यंतच्या हरविलेल्या बालकांचा शोध घेण्यासाठी दिनांक ०१ जुलै २०१७ ते ३१ जुलै २०१७ पावेतो ऑपरेशन मुस्कान राबविण्यात येणार आहे. संपूर्ण गडचिरोली जिल्हयात ऑपरेशन मुस्कान राबविण्यात येणार असून त्यासाठी मा. पोलीस अधिक्षक सा., गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी व यास्तव स्थापन करण्यात येणारे विशेष शोध पथक कार्यरत राहणार आहे. ऑपरेशन मुस्कान अंतर्गत ०१ जुलै २०१७ पर्यंतच्या हरविलेल्या बालकांची यादी संकलित करुन त्यांचा शोध घेण्यात येणार आहे. तसेच सर्व पोलीस घटकांच्या हद्दीत रेल्वे स्टेशन, बसस्थानके, धार्मिक स्थळे, हॉटेल्स, धाबे, कारखाने येथे काम करणारी बालके/बालकामगार/कचरा गोळा करणारी बालके व बेवारस मुले यांची माहिती घेवून या बालकांचे फोटोग्रॉफ्स, व्हिडीओ व्दारे त्यांचे रेकॉर्ड तयार करुन बेवारस बालके मिळून आल्यास योग्य त्या कारवाईनंतर त्यांना त्यांचे पालकांचे स्वाधीन करण्यात येणार आहे. या उपक्रमात स्थानिक गुन्हे शाखा, गडचिरोली, जिल्हा महिला व बाल कल्याण विभाग, बालकांच्या संबंधित काम करणाऱ्या अशासकीय संस्था, प्रसारमाध्यमे यांचाही सहभाग असणार आहे. तरी प्रत्येक गावातील प्रतिष्ठीत नागरिक, सरपंच, पोलीस पाटील, शिक्षक, विद्यार्थी व प्रत्येक नागरिकांनी पोलीस विभागाच्या या उपक्रमात सहभागी होवून गावात, गावाशेजारच्या परिसरात असे बेवारस बालक मिळून आल्यास त्याबाबत जवळच्या पोलीस स्टेशनला कळवून त्यांचे पालकांपर्यंत पोचविण्यास मदत करावी. तसेच जनतेने वरील ठिकाणी बेवारस, संशयास्पद बालकामगार आढळून आल्यास त्यांनी त्याची माहिती जवळचे पोलीस स्टेशनला द्यावी.